Email - Info@maharashtracrimetimes.com

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, पुणे, सातारा, रत्नागिरी

R.N.I. No. MAHMAR/2010/33301

● वर्ष : ९ ● अंक: २३ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार ४ सप्टेंबर २०१८ ते सोमवार १० सप्टेंबर २०१८ मूल्य २/- रुपये

Website:maharashatracrimetimes.com Email-maharashtracrimetimes33301@gmail.com POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2017-2019

३ | भारतीय माओवाद्यांचे रशिया व चीन कनेक्शन

१५ दिवसांनंतर केरळमध्ये शाळा सुरु | ४

# शिस्तीबाबत बोलायला गेल्यास लोक 'हुकूमशहा' म्हणतात

**नवी दिल्ली (अभिजीत येरल्लु)- व्यवस्थेमध्ये शिस्तीला प्राधान्य देणे आवश्यक आहे. मात्र, शिस्त पाळण्याबाबत बोलायला गेल्यास आजकाल लोक 'हुकूमशहा' म्हणून कलंकित करतात, अशी खंत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त करून विरोधकांवर हल्लाबोल केला. उपराष्ट्रपती वेंकय्या नायडू यांच्या उपराष्ट्रपती आणि राज्यसभा सभापतिपदाची वर्षपूर्ती झाली आहे. या काळातील आपल्या अनुभवांचे त्यांनी सचित्र संकलन करुन एक 'कॉफी टेबल बुक' तयार केले आहे. त्याचे झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपराष्ट्रपती वेंकय्या नायडू यांच्यासह माजी पंतप्रधान मनमोहन सिंग आणि अर्थमंत्री अरुण जेटली उपस्थित होते. पुस्तकाचे प्रकाशन केल्यानंतर मोदी म्हणाले, वेंकय्याजी शिस्तीच्या बाबतीत खूपच आग्रही आहेत. मात्र, आपल्या देशातील स्थिती सध्या अशी झाली आहे, की शिस्तीला लोकशाहीविरोधी ठरवले जात आहे. शिस्तीचा कोणी जरा देखील आग्रह केला की लोक त्याला हुकूमशहा म्हणून संबोधत आहेत.**



उपस्थितांसमोर आपले विचार मांडताना मोदींनी नायडूंच्या शिस्तप्रिय कार्यशैलीचा उल्लेख केला. ध्येयपूर्तीसाठी नियमबद्ध कार्यप्रणाली अनिवार्य आहे. व्यवस्था आणि व्यक्ती या दोघांसाठी हा गुण लाभदायक ठरतो, असे मोदी म्हणाले.

दरम्यान, मोदींनी नायडूंना स्वभावाने शेतकरी असे संबोधले. ते म्हणाले, नायडूंच्या डोक्यात कायमच आपल्या देशातील गाव, शेतकरी आणि कृषीसंबंधी गोष्टी घोळत असतात. याचे चांगले उदाहरण सांगायचे झाल्यास नायडू यांनी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये स्वत:ला ग्रामीण विकास मंत्रालय देण्याची इच्छा व्यक्त केली होती. हे खाते मिळाल्यानंतर गावांना शहरांशी जोडणाऱ्या प्रधानमंत्री ग्राम सडक योजना त्यांनी तयार केली. त्यामुळे या योजनेचे श्रेय वेंकय्या नायडू यांनाच जाते. मनमोहन सिंग म्हणाले, उपराष्ट्रपती नायडू यांच्या राजकीय आणि प्रशासकीय अनुभवाची झलक त्यांच्या एका वर्षाच्या कामातून दिसून येते. लोक शेती व्यवसायातून दुसरीकडे वळताहेत हा देशासमोरील एक गंभीर प्रश्न बनला आहे. यासंदर्भात बोलताना नायडू म्हणाले, सध्याच्या काळात सरकारकडून कृषीक्षेत्राकडे पक्षपातीपणे पाहिले जात आहे. कृषीक्षेत्राला टिकून राहण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. इकडे अर्थमंत्रीही उपस्थित आहेत. कदाचित मी जे काय बोलतोय हे त्यांना आवडणार नाही. मात्र, त्यांनी सर्वच क्षेत्रांची काळजी घ्यायला हवी. शेतीकडे पक्षपातीपणे पाहू नये अन्यथा यात फायदा नसल्याने लोक शेतीक्षेत्राकडे दुर्लक्ष करतील.



# उंच थरावरून पडल्याने एका गोविंदाचा मृत्यू



## ६० जण जखमी

**मुंबई (विशाल कारंडे)- मुंबई आणि ठाण्यात दहीहंडीचा उत्साह शिगेला पोहोचला असताना, त्याला गालबोट लागलं आहे. विविध गोविंदा पथकं थर लावून हंडी फोडण्याचा प्रयत्न करत होते. अशा प्रयत्नांमध्ये एका गोविंदाचा मृत्यू झाला. अंकुश खंदारे असं या गोविंदाचं नाव असून तो धारावीत राहणारा होता. २७ वर्षांचा अंकुश थरांवर चढत असताना खाली कोसळला आणि जखमी झाला. त्यातच त्याला फिट आल्याची माहिती आहे. त्याला सायन हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेण्यात आले होते. तिथेच त्याचा मृत्यू झाला.**

मुंबई-ठाण्यात एकूण ६० गोविंदा जखमी झालेत. या सर्व गोविंदांवर विविध हॉस्पिटल्समध्ये उपचार सुरू आहेत. २० गोविंदांना उपचारानंतर घरी जाण्याची परवानगी देण्यात आलीय. तर ४० गोविंदा विविध हॉस्पिटल्समध्ये भरती असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

सायन हॉस्पिटल -२, केईम हॉस्पिटल-४, नायर-७, एस.एल. रहेजा-०१, पोद्दार-२, सेंट जॉर्ज हॉस्पिटल-०१, एम. टी. अग्रवाल-२,राजावाडी-७, महात्मा फुले, व्ही.एन. देसाई-४, भाभा हॉस्पिटल -५, ट्रॉमा केअर-०४ (सर्वांची प्रकृती स्थिर)

त्यामुळे संध्याकाळीही वातावरणात जल्लोष असतो. पोलीस आणि प्रशासनाने सर्व गोविंदा पथकांना काळजीपूर्वक खेळण्याचं आवाहन केलंय. थोडी काळजी घेतली तर आनंदावर विरजण पडणार नाही आणि उत्तमपणे खेळही खेळता येईल. या आधीच सुप्रीम कोर्टानं उंच थर लावण्याला चाप लावल्याने आता फार उंच थर लावता येत नाहीत. त्यामुळेही मोठं अपघात टळणार आहेत. गोविंदा पथकं, आयोजक आणि प्रत्यक्ष खेळणाऱ्या गोविंदांनी काळजी घेतली तर या खेळाचं आनंद वाढू शकतो असं पोलिसांनी सांगितले होते.

# भाजपच्या कार्यक्रमात प्रणवदांची हजेरी

**हरयाणा (सुनील आढाव)-** माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी पुन्हा एकदा वादात अडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्याला कारणही तसेच आहे. हरयाणात भाजप सरकारच्या कार्यक्रमात रविवारी त्यांनी उपस्थिती लावली. यापूर्वी प्रणवदांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमात उपस्थिती लावल्याने मोठा वाद निर्माण झाला होता. आता तर मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर यांच्यासोबत प्रणवदा व्यासपीठावर एकत्र आल्याने काँग्रेस नेत्यांच्या भुवया पुन्हा उंचावल्या आहेत. काही महिन्यांपूर्वी नागपूरमध्ये झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमात प्रणव मुखर्जींनी उपस्थिती लावली होती. त्यापूर्वी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी प्रणवदांना कार्यक्रमात न जाण्याचा सल्ला दिला होता. त्यावरून काँग्रेस-भाजपत शाब्दिक फैरी झडल्या आणि मोठा वाद निर्माण झाला



होता. या घटनेला काही महिने उलटत नाही तोच प्रणव मुखर्जी हे आता भाजपच्या कार्यक्रमात दिसून आले. प्रणव मुखर्जी फौंडेशनच्या अनेक कार्यक्रमांचे उद्घाटन करण्यासाठी मुखर्जी हे मुख्यमंत्री खट्टर यांच्यासोबत एका मंचावर एकत्र आले. मुखर्जी यांनी या कार्यक्रमासाठी १५ वरिष्ठ आणि काही ज्युनिअर पातळीवरील आरएसएसच्या कार्यकर्त्यांना आमंत्रण दिले होते. तसेच आरएसएसच्या सदस्यांनी त्यांना पूर्ण सहकार्याचे आश्वासनही दिल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, या कार्यक्रमानंतर मुखर्जी यांच्या कार्यालयाकडून एक स्पष्टीकरण देण्यात आले. प्रणव मुखर्जी फौंडेशन आरएसएससोबत कुठलेही काम करत नाही आणि पुढील काळात तशी कुठलीही योजना नाही.

# दाभोलकर हत्या कळसकर CBIच्या ताब्यात

**ठाणे (राकेश गायकवाड)-** नालासोपारा शस्त्रसाठा प्रकरण व डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्येप्रकरणी अटक करण्यात



आलेला आरोपी शरद कळसकरचा ताबा आज मुंबई सत्र न्यायालयाने सीबीआयकडे सोपवला. सीबीआयला कळसकरची चौकशी करायची असून त्यासाठी पुणे न्यायालयात त्याला हजर करून कोठडीची मागणी केला जाणार आहे.

दरम्यान, नालासोपारा शस्त्रसाठा प्रकरणातील प्रमुख आरोपी वैभव राऊत तसेच आणखी एक आरोपी सुधन्वा गोंधळेकरला १५ सप्टेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी देण्यात आली असून श्रीकांत पांगारकरच्या पोलीस कोठडीत ६ सप्टेंबरपर्यंत वाढ करण्यात आली आहे.

# 'पत्नीपीडित पुरूषांसाठी राष्ट्रीय पुरुष आयोगाची स्थापना करा'

**नवी दिल्ली (हिंदुस्थान समाचार)-** भाजप खासदार हरिनारायण राजभर यांनी राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर देशात पुरूष आयोगाची स्थापना करण्याची मागणी केली आहे. अनेक पुरूषांना आजच्या घडीला त्यांच्या पत्नीकडून होणाऱ्या त्रासाला सामोरे जावे लागते, असे राजभर यांनी म्हटले आहे. यापूर्वीही खासदार राजभर यांनी पुरूष आयोगाच्या स्थापनेची मागणी केली होती. पुरूषांना महिलांप्रमाणे आपल्याविरोधातील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी व्यासपीठ मिळायला हवे, अशी राजभर यांची भूमिका आहे. खासदार राजभर यांनी लोकसभेत पत्नीच्या त्रासाचा सामना कराव्या लागणाऱ्या



पुरुषांसाठी विशेष आयोग स्थापन करा अशी मागणी केली होती. देशात विविध घटकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आयोग आहेत. त्याप्रमाणे पुरूषांसाठी आयोग का नको ? असा प्रश्न लोकसभेत उपस्थित केला होता.

# अण्णा हजारे २ ऑक्टोबर पासून राळेगण सिध्दीला उपोषण करणार

**राळेगण (विशाल कारंडे)-** लोकपाल बिल, प्रत्येक राज्यात लोकायुक्त नियुक्ती, डॉ. स्वामिनाथन आयोग अंमलबजावणी याबाबत पाच वर्षांपूर्वी दिलेले आश्वासन केंद्र सरकारने पाळले नाही. म्हणून ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी २ ऑक्टोबर पासून राळेगण सिध्दी येथे उपोषण करणार असल्याचे घोषीत केले आहे. भाजपा सरकार सत्तेवर येऊन चार वर्षांपेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. परंतु, अजूनही लोकपाल कायद्याची अंमलबजावणी होत नाही. यामुळे या सरकारमध्ये कृतघ्नता आहे, हे जनतेच्या लक्षात आले आहे असा घणाघती त्यांनी केला आहे. अण्णांनी पत्रक जाहीर केरून ही माहिती दिली आहे. पत्रकात अण्णा म्हणाले की, लोकपाल, लोकायुक्त कायदा बिल संसदेमध्ये १९६६ ते २०११ या काळात वेगवेगळ्या पक्षांनी आठ वेळा आणले. परंतु, बिल पारित होऊ शकले नाही. कारण पक्षांना लोकपाल, लोकायुक्त नको आहे. २०११ मध्ये देशातील जनता



रस्त्यावर उतरली होती. तेव्हा जनतेच्या दबावामुळे तत्कालीन सरकारला लोकपाल, लोकायुक्त कायदा करणे भाग पडले होते. राष्ट्रपतींनी १ मे २०१४ रोजी कायद्यावर स्वाक्षरी केली. यानंतर लोकपाल, लोकायुक्तची नियुक्ती करणे आवश्यक होते. परंतु सरकारने वेगवेगळे कारणे सांगून लोकपाल, लोकायुक्तची नियुक्ती टाळली. सर्वोच्च न्यायालयाने सरकारला अनेकवेळा आदेश काढले.

# पेट्रोल - डिझेलच्या किंमतीत सतत पाचव्या दिवशी वाढ

**मुंबई (सम्यक कासारे)-** पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीत पुन्हा एकदा वाढ झाली आहे. गेल्या पाच दिवसांत सतत पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीत वाढ होताना दिसत आहे. सोमवारी दिल्लीत पेट्रोलच्या दरात ३१ पैसे दराने वाढ झाली आहे. तर डिझेलच्या किंमतीत ३९ पैशांनी वाढ झाली आहे. सोमवारी किंमतीत वाढ झाली असून आता एक लीटर पेट्रोल ७९.१५ रुपये झालं आहे. तर डिझेलची किंमत ७१.१५ रुपये प्रति लीटर दर आहे. मुंबईत सोमवारी पेट्रोलची किंमत ३१ पैशांनी वाढली असून आता दर



८६.५६ रुपये इतका आहे. तर डिझेलमध्ये ४४ पैशांनी वाढ झाली आहे. ज्याचा दर आता ७५.५४ रुपये प्रती लीटर आहे.

## सौजन्य व्हॉट्सअप




# जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद्यां विरोधात जवानांचं मोठं सर्च ऑपरेशन

**श्रीनगर (हर्षद परब)-** दहशतवाद्यांविरोधात जम्मू-काश्मीरमध्ये सुरक्षारक्षकांचं ऑपरेशन ऑलआउट सुरु झालं आहे. लष्कर खोऱ्यात युवकांना मुख्यधारेत आणण्यासाठी प्रयत्न करते आहे. तर दहशतवाद्यांना संपवण्यासाठी ऑपरेशन देखील सुरु आहे. पुलवामामध्ये जवळपास २० गावांमध्ये सर्च ऑ परेशन सुरु आहे. सुरक्षारक्षकांकडून जवळपास २० गावांमध्ये हे सर्च ऑपरेशन सुरु झालं आहे. या गांवामध्ये दहशतवादी लपून बसल्याची माहिती मिळाली आहे. भारतीय जवानांना माहिती मिळाली आहे की, काश्मीर खोऱ्यात मोठ्या प्रमाणात दहशतवाद्यांनी घुसखोरी केली आहे. मागील महिन्यात अनेक स्थानिक तरुण देखील दहशतवादी संघटनेत गेले. लष्कर, सीआरपीएफ आणि स्थानीय पोलीस यांनी एकत्र येत पुलवामामध्ये गांवांना घेरलं आहे. खूपच गतीने हे सर्च अभियान चालवलं जात आहे. पुलवामाच्या कुचेपुरा, मुरान, द्रबगाम, मेत्रीगाम, पुत्रीगाम, गूसू या गावांमध्ये हे अभियान सुरु आहे. दक्षिण काश्मीरच्या शोपिया भागात अनेक दहशतवादी सक्रिय आहेत.



# स्वाइन फ्लूने राज्यात ३१ रुग्णांचा मृत्यू

## पुणे जिल्हयात सर्वाधिक मृत्यू; गेल्या वर्षीच्या तुलनेत संख्या घटली

**पुणे (अभिजीत येरल्लु) -** राज्यात स्वाइन फ्लूच्या ३१ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. त्यापैकी सर्वाधिक मृत्यू पुणे जिल्हयात झाले आहेत. पिंपरी- चिंचवड व पुणे शहर आणि ग्रामीण भागात मिळून १२ रुग्ण मृत्युमुखी पडले आहेत. त्या खालोखाल नाशिक जिल्हयामध्ये या आजाराने आठ रुग्णांचा मृत्यू झाल्याची नोंद झाली आहे.

पावसाळी वातावरणामुळे स्वाइन फ्लूच्या 'एच१एन१' या विषाणूंच्या संसर्गास पोषक वातावरण तयार होत आहे. त्यामुळे राज्यात गेल्या आठ महिन्यांच्या तुलनेत गेल्या



महिन्याभरात स्वाइन फ्लूच्या रुग्णांची संख्या वाढलेली आहे. स्वाइन फ्लू प्रतिबंधक लस, घेतलेली काळजी आणि या आजाराबद्दलची जनजागृती यामुळे स्वाइन फ्लूच्या रुग्णांची संख्या गेल्या वर्षीच्या तुलनेत नियंत्रित असल्याची माहिती पुढे आली आहे. गेल्या वर्षी राज्यात स्वाइन फ्लूचे सहा हजार ८८७ रुग्ण आढळले होते. त्यापैकी ७७८ रुग्णांचा मृत्यू झाला होता. यंदा आतापर्यंत १८० स्वाइन रुग्णांची नोंद झाली आहे, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे देण्यात आली.

## थोडक्यात महत्वाचे

### निसर्गचित्रांनी रेखाटलेले डबे मध्य रेल्वेच्या ताफ्यात

**मुंबई (प्रतिनिधी)-** दिवसभराच्या कामाच्या ताणासोबतच लोकल पकडण्यासाठी करावी लागणारी धावपळ, गर्दी आणि गोंगाट यामुळे हैराण झालेल्या मध्य रेल्वेच्या प्रवाशांचा प्रवास लवकरच निसर्गचित्रांनी नटलेल्या प्रसन्न डब्यांतून होणार आहे. हिरवी झाडे, गवत, फुलपाखरे



आदी निसर्ग चित्रे रेखाटलेले विशेष डबे मध्य रेल्वेवर धावणार असून पहिल्या टप्प्यामध्ये दोन डबे महिला प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहेत. रेल्वेच्या डब्यांमध्ये रंगसंगतीबाबत काही नियम ठरलेले आहेत. मात्र या नियमांना बाजूला सारत प्रवाशांचा विचार करून रंगसंगती वापरून लोकलच्या डब्यांचे रुपडे बदलण्यात आले आहे. माटुंगा येथील कार्यशाळेमध्ये हा नवीन प्रयोग साकारला आहे. कार्यशाळेतील अमोल धाबडे, चंदू अगुरु या प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांच्या कल्पकतेतून डब्यांमध्ये गुलाबी, हिरव्या रंगसंगतीचा वापर करून विविध आकाराची फुले, फुलपाखरे, गवत आदी आकर्षक चित्रे रेखाटण्यात आली आहेत. प्रवासातील ताण विसरून नवा उत्साह येण्यासाठी हे रंग पूरक असल्याने हा प्रयोग हाती घेण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यामध्ये दोन डबे रंगविण्यात आले असून लवकरच महिला प्रवाशांसाठी सुरू करण्यात येतील.

### पनवेल-चिपळूण थेट रेल्वेसेवा; तिकीट फक्त 50 रूपये...!

**मुंबई (हर्षद परब)-** गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्यांसाठी एक खूशखबर आहे. पनवेल-चिपळूणरेल्वेची डीएमयू सेवा ४ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. गणेशोत्सवानिमित्त ही रेल्वे सेवा सुरू करण्यात आली आहे. पनवेल रेल्वे स्थानक सल्लागार समितीच्या बैठकीत याबाबतची माहिती देण्यात आली. ४ सप्टेंबर ते ३० सप्टेंबरपर्यंत रेल्वे धावणार आहे. ही रेल्वे १२ डब्यांची असून यामध्ये एक प्रथम दर्जाचा आणि एक महिलांसाठी आरक्षित डबा असणार आहे. तसेच, या रेल्वेचे तिकिट आरक्षित नसून प्रवाशांना करंट बुकिंग करावे लागणार आहे. पनवेलमधील जुन्या रेल्वे स्थानकाच्या खिडकीवर प्रवाशांना तिकिटे उपलब्ध होतील. या रेल्वे प्रवासाचे



तिकीट फक्त ५० रूपये आहे. याचबरोबर, ही रेल्वे सकाळी ११ वा. १० मिनिटांनी सुटणार आहे. रोहा, कोलाड, इंदापूर, माणगाव, गोरेगाव रोड, वीर, सपे वामने, करंजाडी, विनहेरे, दिवानखावटी, खेड, अंजनी, चिपळूण आदी ठिकाणांहून प्रवास करीत त्याच दिवशी संध्याकाळी चिपळूणला ४ वा. पोहचेल. चिपळूणहून ही रेल्वे सायं. ५.३० वा. पनवेलकडे याच मार्गाने रात्री १०.३० वाजता पोहोचेल.

### घर देण्याच्या नावाखाली वनपालाकडून गरजूची फसवणूक, लाखो रुपयांचा गंडा

**मुंबई (नमिता मुणगेकर)-** घर देण्याच्या नावाखाली संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनपाल अरुण रसाळ याने लाखो रुपयांना फसवणूक केल्याची तक्रार कस्तुरबा मार्ग पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मात्र याबाबत आरोपीवर कारवाई करण्यास पोलीस टाळाटाळ करीत असल्याने या प्रकरणाची चौकशी करण्याचे निवेदन केतन जाधव यांनी मुख्यमंत्री आणि पोलीस आयुक्तांना सादर केले आहे. या वनपालाने अन्य काही गरजूंचीही फसवणूक केल्याची शक्यता वर्तवण्यात



येत आहे. फेब्रुवारी २०१२मध्ये राष्ट्रीय उद्यानातील सिंहविहारातील वनपाल रसाळ याने जोगेश्वरी येथील वांद्रेकरवाडीत राहाणाऱ्या दत्ताराम जाधव यांना वनखात्याच्या जागेत १४ लाख ३० हजार रुपयांना घर देण्याचे आश्वासन देऊन त्यांच्याकडून ही रक्कम उकळली होती. त्याबदल्यात त्याने विक्री कराराची कागदपत्रेही दिली. मात्र अनेक वर्षे पाठपुरावा करूनही त्याने घराचा ताबा दिला नाही. त्याच्याकडे पाठपुरावा करणारे दत्ताराम जाधव यांचे २३ फेब्रुवारी २०१६ रोजी निधन झाले. त्यानंतर दत्ताराम जाधव यांचा मुलगा केतन यांनी वनपालाकडे पाठपुरावा केला असता १८ फेब्रुवारी २०१७ रोजी वनपालाने ३ लाख १० हजार रुपये परत केले आणि उर्वरित रक्कम देण्याचे स्टॅम्प पेपरवर लिहून दिले.

## भारतीय माओवाद्याचे रशिया व चीन कनेक्शन

**मुंबई (अमोल)-** नक्षलींशी असलेल्या संबंधांवरुन २९ ऑगस्ट रोजी पुणे पोलिसांनी देशभरात नऊ ठिकाणी छापे मारले होते. छाप्यामध्ये हजारो पत्रं मिळाली आहेत, ज्यामध्ये नक्षलवाद्यांना मदत होत होती, हे सिद्ध होते. या सर्व छाप्यांचे व्हिडिओ शुटींग केल्याचे पोलिसांनी सांगितले. पुणे पोलिसांनी मारलेल्या छाप्यामधून हजारो पत्रे मिळाली आहेत. या पत्रांमधून अनेक महत्त्वाची माहिती मिळाली आहे. यामध्ये भारतीय माओवाद्यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय माओवाद्यांशी संबंध होते आणि ते त्यांच्या सतत संपर्कात होते अशी माहिती पोलिसांनी दिली.

भारतीय माओवादी चीन, रशियासह अन्य देशांतील माओवाद्यांशी संपर्कात असल्याचे या पत्रातील माहितीवरून स्पष्ट होतेय. भारतीय माओवादी विदेशातील माओवाद्यांच्या सतत संपर्कात होते. भारतामध्ये मोठे षडयंत्र आखण्यात आले होते. यासाठी त्यांच्या विदेशातील माओवाद्यांसोबत भारताबाहेर बैठकाही झाल्या आहेत. त्यांची अशीच एक बैठक पॅरीस येथे झाल्याचे पत्राद्वारे स्पष्ट होते आहे. यामधून भारतात षडयंत्र रचण्यासाठी मोठी रसद आणि



शस्त्रसाठाही पुरवला जाणार होता. मिळालेल्या अनेक पत्रांमध्ये आर्थिक व्यवहारांची तसेच शस्त्रं खरेदी करण्याबाबत माहिती समोर आली आहे. पत्रांमध्ये अत्यंत खळबळजनक माहिती असून देशाविरूद्ध युद्ध पुकारणं, शस्त्रांस्त्रांची खेरदी करणं आणि मोदी राज संपवण्यासाठी त्या शस्त्रांचा वापर करणं, राजीव गांधींची हत्या झाली त्यासारख्या घटनेची पुनरावृत्ती करणं असा अत्यंत खळबळजनक पुरावाच पोलिसांनी आज सादर केला. अशी हजारो पत्र पोलिसंच्या हाती लागली असून त्यातली मोजकीच पत्र आम्ही जाहीर करत आहोत अशी माहितीही सिंग यांनी दिली.

अतिरिक्त पोलिस महासंचालक परमवीर सिंग यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेतली आणि पाचही माओवाद्यांवर केलेली कारवाई अत्यंत योग्य असून मोठ्या षडयंत्राचा पर्दाफाश केल्याचा दावा त्यांनी केला. वरवरा राव, अरूण परेरा, सुधा भारद्वाज, गौतम नवलखा व वर्नन गोन्साल्विस यांना झालेली अटक अत्यंत योग्य होती. परंतु सुप्रीम कोर्टाच्या आदेशावरून त्यांना स्थानबद्धतेत ठेवल्याचे ते म्हणाले.

## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना दिलासा, मंडपांना परवानगी देण्याची मुदत राज्य सरकारने वाढवली

**मुंबई (सम्यक कासारे) -** सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना मंडपांच्या परवानगीसाठीची मुदत सरकारने ५ सप्टेंबरपर्यंत वाढवली आहे. त्यामुळे अद्याप मंडपांना परवानगी न मिळालेल्या मंडळांना ५ सप्टेंबरपर्यंत परवानगी मिळवण्यासाठी अर्ज करता येणार आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या श्रीगणेशाच्या आगमनाला आता केवळ पंधरवडा उरला आहे. मात्र अद्यापही अनेक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना परवानगी मिळालेली नाही.

त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई भाजपाध्यक्ष अशिष शेलार आणि सार्वजनिक गणेशोत्सव महासंघाचे पदाधिकारी यांची बैठक झाली. यावेळी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना दिलासा देताना राज्य सरकारने मंडपांच्या परवानगीसाठीची मुदत ५ सप्टेंबरपर्यंत वाढवली

मुंबई उच्च न्यायालयाच्या नियमांनुसार या वर्षी गणेशोत्सव मंडळांना मंडपासाठी ऑनलाइन परवानगी देण्यात येत आहे. गणेशोत्सव मंडळांची गैरसोय



टाळण्यासाठी हा प्रयोग सुरू करण्यात आला आहे. मात्र, तांत्रिक अडचणीमुळे ही प्रकिया संथगतीने सुरू असल्याने अर्जाची मुदत तिसऱ्यांदा वाढविण्यात आली आहे. यापूर्वी मंडळांना २ सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याची मुदत देण्यात आली होती.

## मोबाइल चोरांचा रेल्वे अड्डा!




**मुंबई (विशाल कारंडे)- एके काळी पाकीटमारांमुळे कुप्रसिद्ध असलेल्या मुंबईच्या उपनगरी रेल्वेसेवेवर आता मोबाइल चोरीमुळे कलंक लागत आहे. २०१६पासून रेल्वेच्या तिन्ही मार्गावर तब्बल ४१ हजार ८८१ मोबाइल चोरीच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत. याचा दिवसगणिक हिशेब करता दररोज सरासरी ४३ मोबाइल रेल्वेतून लंपास केले जात असल्याचे दिसून येते. रेल्वेच्या कळवा स्थानकात मोबाइल चोरीमुळे एका प्रवाशाला जीव गमवावा लागला. त्यामुळे मोबाइल चोरीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. प्रवाशांच्या पाकिटावर डल्ला मारण्याऐवजी प्रवासादरम्यान सदैव त्यांच्या हातात असलेल्या स्मार्टफोनकडे चोरट्यांची नजर वळली आहे.**

लोहमार्ग पोलिसांच्या आकडेवारीनुसार जानेवारी २०१६ पासून जुलै २०१८पर्यंत तिन्ही मार्गावर ४१ हजार ८८१ मोबाइल चोरीला गेल्याच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत. बोरिवली, कुर्ला, ठाणे व वडाळा पोलीस ठाण्यात सर्वाधिक मोबाइल चोऱ्यांची नोंद झाली आहे. मात्र या काळात केवळ ४ हजार ९३७ मोबाइल चोरांच्या मुसक्या आवळण्यात यश आले आहे. पश्चिम, मध्य रेल्वे मुख्य मार्ग व हार्बरवर होणाऱ्या एकूण चोऱ्यांपैकी ९० टक्के चोऱ्या या मोबाइलच्या असल्याचे लोहमार्ग पोलीस सांगतात. लोकल प्रवासात, स्थानकात गर्दीतून चालताना चोरांकडून मोबाइल लंपास केले जातात. यासाठी अनेक शक्कल लढवण्यात येतात. तीन ते चार जणांचा ग्रुप बनवून प्रवाशाला बोलण्यात गुंतवून ठेवणे, लोकल प्रवासात डब्याजवळ उभे राहून प्रवास प्रवाशाच्या हातावर दोन स्थानकादरम्यान किंवा फलाटावर उभ्या असलेल्या चोरांकडून फटका मारून मोबाइल चोरणे किंवा पादचारी पूल, स्थानकात उभ्या असलेल्या एकट्या प्रवाशाला हेरून मोबाइल खेचून पळ काढण्याचे प्रकार केले जातात. लोकल डब्याच्या दरवाजाजवळ उभे राहून मोबाइलवर बोलू नका, असे आवाहन रेल्वे पोलिसांकडून केले जाते. तरीही याकडे प्रवासी दुर्लक्षच करतात. हेच हेरून चोरांकडून मोबाइल लंपास केला जातो. दोन स्थानकांदरम्यान रुळावर उभे राहूनही प्रवाशांच्या हातावर फटका मारून मोबाइल चोरला जातो.

## नाईलाजास्तव पडसलगीकर सांभाळणार पदभार

**मुंबई (विशाल कारंडे)-** निष्कलंक, प्रामाणिक आणि निर्विवाद आयपीएस अधिकारी अशी ओळख असलेले राज्याचे विद्यमान पोलिस महासंचालक दत्ता पडसलगीकर. मुंबईचे माजी पोलीस आयुक्त आणि विद्यमान पोलीस महसंचालक दत्ता पडसलगीकर उद्या निवृत्त होणार होते. मात्र, त्यांच्या सेवाज्येष्ठतेचा उपयोग करुन घेण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारने त्यांना तीन - तीन महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. मात्र, राज्यात सध्या सुरु असलेली परिस्थिती पाहता पडसलगीकर या मुदतवाढीकरिता नाखूष असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. जर पडसलगीकरांनी मुदतवाढ नाकारली असती तर त्यांना निवृत्त न होता राजीनामा द्यावा लागला असता, मात्र सलग ३० पेक्षा जास्त वर्ष सेवेत असलेल्या पडसलगीकरांना रीतसर निवृत्त होण्यासाठी निदान राज्य सरकारने दिलेली मुदतवाढ स्विकारावी



लागणार आहे. त्यामुळेच नाईलाजास्तव पडसलगीकर १ सप्टेंबरपासून वाढीव पदभार स्विकारत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. राज्यात तसेच देशात सध्या नक्षलीविरोधातील कारवाई आणि कट्टर हिंदुत्ववाद्यांचे अटकसत्र जोरात सुरु आहे. या पार्श्वभूमीवर तपास सुरु असताना दत्ता पडसलगीकर यांच्यासारख्या निष्कलंक, प्रामाणिक आणि कर्तव्य कठोर असणाऱ्या अधिकाऱ्याच्या अनुभवाचा फायदा घेण्याची विनंती सरकारच्यावतीने करण्यात आली.

## अमली पदार्थ विक्रेत्या महिलांवर नजर

**मुंबई (योगेश होळंब) -** अमली पदार्थाची निर्मिती आणि पुरवठा करणाऱ्या साखळीवर आघात केल्यानंतर अमली पदार्थविरोधी पथकाने शहरातील किरकोळ विक्रेत्यांना रडावर घेतले आहे. त्यातही महिला विक्रेत्यांवर पथकाची विशेष नजर आहे. ऑगस्ट महिन्यात शहरात विविध ठिकाणी कारवाया करून पथकाने ११ छोट्या-मोठ्या महिला विक्रेत्यांना बेड्या ठोकल्या आहेत.

गेल्या वर्षी अमली पदार्थविरोधी पथकाने एमडीचे उत्पादक, वितरक, बडे पुरवठादारांना शिताफीने अटक केली. त्यापाठोपाठ चरस, गांजा आणि कोकेनच्या वितरण साखळीविरोधात धडक मोहीम उघडली. या साखळीविरोधात सुमारे ६५ गुन्हे नोंद झाले, आरोपींना अटक केली गेली आणि त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात अमली पदार्थाचा साठा हस्तगत केला गेला. या कारवाईमुळे सध्या अमली पदार्थाचा मोठा साठा पोचता करण्यास निर्माते, वितरक आणि



त्यांचे वाहक कॅरिअर नकार देतात. त्यामुळे आता पथकाने शहरातील छोट्या-मोठ्या विक्रेत्यांविरोधात आघाडी उघडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार या वर्षी विशेषत: जुलै, ऑगस्ट महिन्यांपासून पथकाच्या विविध कक्षांनी हद्दीतल्या किरकोळ प्रमाणातील अमली पदार्थ थेट ग्राहकांना उपलब्ध करून देणाऱ्या विक्रेत्यांची धरपकड सुरू केली आहे. ऑगस्ट महिन्यात पथकाने भांडुप, वरळी, गोरेगाव, सांताक्रूझ, वांद्रे या परिसरात छापे टाकून २१ विक्रेत्यांना अटक केली. त्यात ११ महिलांचा समावेश आहे.

वरळी पथकाने नाशिकहून गांजाचा साठा मुंबईत आणणाऱ्या लता चौरे या महिलेला बेड्या ठोकल्या. तिच्याकडून १० किलो गांजा हस्तगत केला गेला. लताने गेल्या दोनेक महिन्यांमध्ये मुंबईच्या १५ ते २० वाऱ्या केल्या. आरोग्यसेविकेच्या वेशात तिने गांजाचा किरकोळ साठा दडवून मुंबईत आणल्याचे चौकशीत स्पष्ट झाले.

## नाणार विरोधकांचे गणगोत जमीन व्यवहारात गुंतलेले!

**मुंबई (नमिता मुणगेकर)-** जाणार तेलशुद्धीकरण प्रकल्पाला राजकीय विरोध करणाऱ्या मंडळींचेच गणगोत या प्रकल्पाच्या परिसरातील स्थानिकांच्या जमिनीबाहेरील धनिकांना मिळवून देण्याच्या व्यवहारात गुंतलेले होते, असा गौप्यस्फोट भाजपचे माजी आमदार प्रमोद जठार यांनी मुंबईत पत्रकार परिषदेत केला. एक तर हा प्रकल्प वाईट असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पटवून द्यावे किंवा प्रकल्प चांगला असल्याचे पटवून घ्यावे. उगाच कोकणातील वातावरण खराब करू नये, असा टोलाही जठार यांनी शिवसेना नेते उद्धव ठाकरे व खासदार नारायण राणे यांना लगावला.

शिवसेना आणि नारायण राणे हे नाणार प्रकल्पाला विरोध करत आहेत. दोघेही भाजपचे सहकारी पक्ष या नात्याने सत्तेत भागीदार आहेत. त्यामुळे या दोघांना मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी संवाद साधणे सहज शक्य आहे. हा प्रकल्प वाईट असल्याचे या दोघांनी मुख्यमंत्र्यांना पटवून द्यावे किंवा प्रकल्प चांगला असल्याचे पटवून घ्यावे आणि ते कबूल करावे. या प्रकल्पावरून उगाच स्थानिकांच्या मनात गैरसमज तयार करून कोकणातील वातावरण खराब करू



नये, असे जठार म्हणाले. विजयदुर्ग येथे समुद्राची खोली १९ मीटरपेक्षा जास्त असल्याने तेथे मोठे बंदर व्हावे अशी मागणी आम्ही केंद्रीय बंदर विकासमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली होती. त्यांनी ती मान्य केली. त्याच सुमारास अरब देशांतून कच्चे तेल आयात करणे सुलभ होईल अशा पश्चिम किनारपट्टीवरील ठिकाणाचा शोध सुरू होता. विजयदुर्गला मोठे बंदर होतच आहे तर त्याच्याच जवळपास जागा असल्यास चांगले होईल या विचारातून गुहागर आणि नाणार या दोन जागांची पाहणी झाली. पैकी नाणारवर शिक्कामोर्तब झाले, अशी माहितीही जठार यांनी दिली.

## पाऊस कमी झाल्याने तापाची साथ
## मलेरिया, गॅस्ट्रोचे रुग्ण वाढले!

**मुंबई (विजय पंचमुख)-** शहर-उपनगरात ऑगस्ट महिन्यात पावसाने ब्रेक घेतला आहे. परंतु, या कालावधीत वातावरणीय बदलांमुळे आजारांचे प्रमाण मात्र वाढले आहे. ऑगस्ट महिन्यात साथीच्या आजारांचे एकूण सात बळी गेले असून, मलेरिया आणि गॅस्ट्रोच्या रुग्णांत प्रचंड वाढ झाली आहे. त्यामुळे मुंबईकरांनी ताप अंगावर काढू नये, वेळीच लक्षणे ओळखून वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन पालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्याने केले आहे.

ऑगस्ट महिन्यात मलेरियाचे तब्बल ८०४ रुग्ण आढळले आहेत. तर गॅस्ट्रोच्या ६४५ रुग्णांची नोंद पालिकेच्या आरोग्य खात्याकडे झाली आहे. त्याखालोखाल डेंग्यू आणि हेपेटायटिसच्या रुग्णांचे प्रमाण अधिक आहे. याखेरीज ऑगस्ट महिन्यात डेंग्यूसदृश आजाराचे २ हजार ३१७ रुग्ण आढळले असून, त्यांच्यावर पालिकेच्या विविध रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. ही संख्या २०१७ साली १ हजार



९३६ एवढी होती. ऑगस्ट महिन्यात डेंग्यूच्या बळीनंतर पालिका प्रशासनाने सी, एच/साऊथ आणि एफ/साऊथ विभागातील १ हजार १६९ घरांतील ६ हजार ७५२ व्यक्तींची तपासणी केली. यात सात जणांना ताप असल्याचे आढळले, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तर १ हजार ५४ घरांत धूरफवारणी करण्यात आली. या विभागातील ५६८ घरांच्या तपासणीत चार घरांत डासांच्या अळया आढळल्या, त्या नष्ट करण्यात आल्या. तर लेप्टोच्या बळीनंतर एम/ईस्ट वॉर्डमध्ये १ हजार १२० घरांतील ३ हजार ६६० लोकसंख्येची तपासणी करण्यात आली, त्यात तिघांना ताप दिसून आला.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, यांचे कार्यालय
ई निविदा सूचना क्र. [illegible] सन २०१८-२०१९
[illegible]
कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
फोर्ट, मुंबई.
डीजीआयपीआर/२०१८-२०१९/२७६९

# ‘ये अंदर की बात है.., राज ठाकरे हमारे साथ है’

**ठाणे (धनश्री सट्टा)-** ठाण्याचे राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी ’ये अंदर की बात है...राज ठाकरे हमारे साथ है...छुपा साथ हैं..’ असं वक्तव्य करून राजकारणात नव्या विषयाची ’हंडी’ फोडलीये. विशेष म्हणजे जितेंद्र आव्हाड यांनी हे मनसेच्या व्यासपीठावर हे वक्तव्य केलंय. ठाण्यातील मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी भव्य दहीहंडीचं आयोजन केलंय. १० थर लावणाऱ्या मंडळाला २१ लाखांचे बक्षीस जाहीर केलंय. दुपारी राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी मनसेच्या दहीहंडी उत्सवात हजेरी लावली. मनसेच्या व्यासपीठावर राष्ट्रवादीच्या नेत्यांची एंट्री पाहुन सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. यावेळी जितेंद्र आव्हाड यांनी स्टेजवर वादग्रस्त वक्तव्य केलं. ’ये अंदर की बात है... राज ठाकरे हमारे साथ है असं



म्हणत त्यांनी हा छुपा साथ है हे म्हणायला विसरले नाही. त्यांच्या या विधानामुळे एकच गोंधळ उडाला.

विशेष म्हणजे, जितेंद्र आव्हाड यांनी ३ तास स्टेजचा ताबाच घेतला. गेली ३ तास व्यासपीठावरून त्यांचाच उत्सव असल्याप्रमाणे बिंधास्त होऊन वावरत होते. एवढंच नाहीतर गोविंदांच्या खांद्यावर बसूनही नाचले. त्यामुळे जितेंद्र आव्हाड यांच्याकडून हा मनसेचा कार्यक्रम हायजॅक झालाय की काय अशी चर्चा रंगली होती.

भरात भर म्हणजे, पाचपाखडी येथील विरोध करणाऱ्या स्थानिक रहिवाश्यांना जितेंद्र आव्हाज नतद्रष्ट म्हणाले. मनसेच्या दहिहंडी उत्सवात शेजारील इमारतीवरील रहिवाशांच्या चांगल्या प्रतिसादावर मनातील खंत व्यक्त केली. पण पाचपाखडीच्या त्रस्त रहिवाशांना नतद्रष्टं म्हटल्यामुळे आता पुन्हा वाद होणार हे नक्की.

# राज्यातील ३०० उपकेंद्रांना मिळणार डॉक्टर

**नाशिक (सुनील आढाव)-** ग्रामीण भागातील रुग्णांना आरोग्य उपकेंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्याकडून उपचार मिळावेत. यासाठी बी. ए. एम. एस. पदवीधारक वैद्यकीय अधिकाऱ्यासाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने सहा महिन्यांचा विशेष अभ्यासक्रम निश्चित केला आहे. त्यामुळे राज्यातील १० हजार उपकेंद्रांना स्वतंत्र डॉक्टर उपलब्ध होतील. पहिल्या टप्प्यात नाशिकसह राज्यातील ९ जिल्ह्यांतील ३०० आरोग्य उपकेंद्रांचा समावेश करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत आरोग्य उपकेंद्रामध्ये फारसी वैद्यकीय सुविधा नाहीत. वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होणार असल्याने त्याठिकाणी नव्याने वैद्यकीय साहित्यांसह उपकरणे, औषधसाठा, कक्ष उभारणी, आंतररुग्ण सेवा व्यवस्था आदी उभारणीसाठी ७ लाख रुपयांचा निधी दिला जाणार आहे.

आरोग्य उपकेंद्रात सद्य:स्थिती प्रशिक्षित परिचारिका रुग्णांवर उपचार करते. पण, बऱ्याचदा रुग्णांच्या गंभीर आजाराचे निदान होत नाही. रुग्णही उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात अथवा उपजिल्हा रुग्णालयात जाणे टाळतात. त्यामुळे ग्रामीण भागातील आरोग्य अनास्था मोठी आहे. ही समस्या दूर करण्यासाठी आरोग्यसेवा गावात पोचवण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ‘आरोग्यवर्धिनी केंद्र’ (हेल्थ वेलनेस



क्लिनिक) उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्यासाठी राज्यातील उपकेंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी नियुक्त केला जाणार आहेत. उपकेंद्रात प्रशिक्षित डॉक्टर उपलब्ध झाल्याने रुग्णांना गावातच उपचार मिळतील. गंभीर आजाराचे निदान होऊन त्यावर प्राथमिक अथवा उपजिल्हा रुग्णालयात अधिक उपचार करणे शक्य होईल.

# कन्हैया कुमार लोकसभा लढवणार

**नवी दिल्ली (हिंदुस्थान समाचार)-** येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील विद्यार्थी संघटनेचा माजी अध्यक्ष कन्हैया कुमार आता राष्ट्रीय राजकारणात आपले नशीब आजमावणार आहे. २०१९ मध्ये कन्हैया कुमार लोकसभेची निवडणूक लढवणार आहे.



कन्हैया कुमार सीपीआयच्या तिकिटावर बिहारमधील बेगुसराय लोकसभा मतदार-संघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे. बेगुसरायमधून कन्हैया कुमारने निवडणूक लढवावी, यावर सर्व डाव्या संघटनांचे एकमत झाल्याची देखील माहिती समोर आली आहे.

# १५ दिवसांनंतर केरळमध्ये शाळा सुरु

**कोची (वृत्तसंस्था)-** केरळमध्ये शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्था सुमारे १५ दिवसांनंतर सुरु झाल्या आहेत. पुराचे पाणी ओसरल्यानंतर शैक्षणिक संस्थांच्या इमारतीत साचलेली दलदल आणि केरकचरा हटवून त्या स्वच्छ करण्याला प्राधान्य देण्यात आले होते. पुरामुळे नष्ट झालेली पुस्तके आणि विद्यार्थ्यांचे गणवेश राज्य सरकार विद्यार्थ्यांना पुरवणार असल्याची घोषणा सरकारकडून करण्यात आली. आहे. अनेक शाळांत अजूनही पुराने बेघर झालेले १ लाख ९७ हजार नागरिक राहत आहेत. त्यांना लवकरात लवकर त्यांच्या घरी पाठवण्याचे प्रयत्न लष्करी पातळीवर सुरु आहेत. येत्या ३ सप्टेंबरला राज्यातील सर्व शाळा आणि कॉलेजेस सुरु होतील असा विश्वास केरळचे शिक्षणमंत्री प्रा. सी रवींद्रनाथ यांनी व्यक्त केला आहे. दुसरीकडे महापुराचा प्रचंड फटका बसलेला कोची विमानतळ पुन्हा पूर्णपणे सुरु करण्यात आला. या विमानतळावरून ३० देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमानोड्डाने पार पडली. ३० विमानाचे लँडिंगही कोचीत झाले.

# महागाईचा पुन्हा भडका उडणार!

## सीएनजी, वीज महागणार?

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)- केंद्र सरकार सामान्यांना महागाईच्या खाईत लोटण्याचे संकेत दिलेत. ऑक्टोबर महिन्यापासून सीएनजी, वीज दर महागण्याची शक्यता आहे. परदेशी बाजारातील तेजीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार देशांतर्गत उत्पादित नैसर्गिक वायूच्या किंमती १४ टक्क्यांनी वाढवण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे किरकोळ सीएनजी, वीज आणि यूरिया उत्पादन खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महागाईला आमंत्रण मिळण्याचे संकेत आहेत.**



नैसर्गिक वायूच्या घरगुती उत्पादकांना सध्या ३.६ डॉलर प्रति युनिट एमएमबीटीयू किंमत मिळत आहे. ऑक्टोबरमध्ये या किमतीत १४ टक्क्यांची वाढ होण्याची शक्यता आहे. नैसर्गिक वायूच्या किमतींचा दर सहा महिन्यांनी आढावा घेतला जातो. त्यानंतर ठरविण्यात येणारे नवे दर अतिरिक्त वायू उपलब्ध असलेल्या अमेरिका, रशिया आणि कॅनडा या देशांच्या केंद्रांवर प्रचलित दरांच्या सरासरीवर अवलंबून असतात. त्यामुळे यावेळी वायूचे दर वाढण्याची दाट शक्यता आहे, अशी सूत्रांनी माहिती आहे.

नव्या दरांची घोषणा येत्या २८ सप्टेंबरला होण्याची शक्यता आहे. भारताला आवश्यक असलेल्या वायूपैकी ५० टक्के वायू आयात केला जातो. या वायूची किंमत घरगुती गॅसच्या किंमतीच्या दुप्पट असते. घरगुती गॅसचे नवे दर येत्या १ ऑक्टोबरपासून पुढील ६ महिन्यांसाठी असणार आहेत. हे नवे दर ऑक्टोबर २०१५ पासून ते मार्च, २०१६ या कालावधीतील दरांच्या तुलनेत सर्वाधिक दर असणार आहेत. नैसर्गिक वायूचे दर वाढण्याने ओएनजीसी आणि रिलायन्स इंडस्ट्रीजच्या मिळकतीत वाढ होणार आहे. तथापि, यात सीएनजीचाही दर वाढणार आहे. बरोबरच यामुळे यूरिया आणि वीजेच्या उत्पादन खर्चात देखील वाढ होण्याची शक्यता आहे.

# फसलेल्या नोटबंदीनंतर पंतप्रधान कोणतं प्रायश्चित घेणार?’

**मुंबई (सम्यक कासारे)-** नोटबंदीच्या निर्णयानंतर रिझर्व्ह बँकेत जवळपास सगळ्याच नोटा परत आल्याचं वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाल्यावर मोदी सरकारवर चौफेर टीका सुरू झाली आहे. शिवसेनेचं मुखपत्र सामनाच्या अग्रलेखातून जोरदार टीकास्त्र सोडण्यात आलंय. सामनाच्या अग्रलेखात रिझर्व्ह बँकेला झिंगलेल्या माकडाची उपमा देण्यात आलीय. नोटबंदीच्या निर्णयानंतर ५० दिवसात परिस्थिती सुधारली नाही, तर भर चौकात जी शिक्षा द्याल ती भोगेन असं मोदींनी म्हटलं होतं. त्यामुळे सपशेल फसलेल्या नोटबंदीनं आता पंतप्रधान कोणते प्रायश्चित्त घेणार आहेत? असा प्रश्नही सामनाच्या अग्रलेखात विचारण्यात आलाय.



रिझर्व्ह बँक ही देशाच्या अर्थव्यवस्थेची संरक्षक असते. विद्यमान राजवटीत रिझर्व्ह बँकेचे झिंगलेले माकड झाले आहे. नोटाबंदीच्या निमित्ताने देशप्रेमाचे धडे देण्यासाठी ‘भगतगण’ पुढे पुढे करीत होते. मात्र ‘झिंगलेल्या माकडा’लाही नोटाबंदीचे ‘सत्य’ लपवणे अवघड झाले आणि हे ‘वास्तव’ त्याच्या अहवालातून समोर आले. नोटाबंदी हा फियास्कोच होता हे ‘झिंगलेल्या माकडा’नेच मान्य केले आहे. झिंगलेल्या माकडाची ही गोष्ट आहे. ती लिहिणे इसापलाही जमले नसते, असं अग्रलेखाच्या मथळ्यात म्हटलं गेलंय. तर सपशेल फसलेल्या नोटाबंदीने देशाला आर्थिक अराजकात ढकलले.



त्यामुळे देशाला दिलेल्या वचनास जागून पंतप्रधान मोदी हे आता कोणते प्रायश्चित्त घेणार आहेत? असा प्रश्नही यातून विचारण्यात आलाय. नोटाबंदी’ हा अघोरी प्रयोग होता व त्यामुळे देशाचे सवादोन लाख कोटींचे नुकसान झाले. हा भ्रष्टाचार आहे. देशाच्या तिजोरीची लूट आहे व रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरनी ही लूट रोखली नाही म्हणून त्यांना न्यायासनासमोर उभे केले पाहिजे.

## एका माणसाच्या हट्टापायी नुकसान झाले,राज ठाकरेंची मोदींवर टीका

**औरंगाबाद (तेजस नांगरे)-** मी नोटबंदी नंतर चुकीचा निर्णय म्हणून पहिल्यांदा बोललो आता ते सगळे सत्य समोर आलंय. केवळ एका माणसाच्या हट्ट पायी सगळी नुकसान झाले अशी टीका मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केली. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे मराठवाड्याच्या दौऱ्यावर आहे. आज औरंगाबादमध्ये राज ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेऊन मोदी सरकारवर एकच हल्लाबोल केला. मोदींनी नोटबंदी लागू गेली आणि आता त्यांचं सत्य बाहेर आलंय. रिझर्व्ह बँकेनंच पैसे किती परत आले याबद्दल उघड केलंय. हे मीही याआधी बोललो होतो फक्त एका माणसाच्या हट्टामुळे सर्वांचं नुकसान झालं अशी



टीका राज ठाकरेंनी केली. मराठा आंदोलनादरम्यान वाळूज एमआयडीसीमध्ये परप्रांतीयांनी तोडफोड केली होती आणि हे पोलिसांनीही स्पष्ट केलं. त्यामुळे या तोडफोडीचा मराठा आंदोलकांशी काहीही संबंध नव्हता असंही राज ठाकरेंनी यावेळी सांगितलं. माओवादी संबंधीत पाच जणांना अटकेबद्दल राज ठाकरेंनी भाष्य केलं. लोकशाही टिकवण्यासाठी वेगवेळ्या विचारांची आवश्यकता असावीच लागते अमर्त्य सेन म्हणतात ते खरे आहे भारताची लोकशाही अडचणीत आहेच आपल्याला आता विचार करावाच लागेल असंही राज ठाकरे म्हणाले.

# मुंबई एअरपोर्टचं नाव आता छत्रपती शिवाजी ‘महाराज’ आंतरराष्ट्रीय विमानतळ

**मुंबई (अमोल गुडेकर)-** मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नावात सुधारणा करण्यात आली आहे. ‘छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ’ असा शिवरायांचा पूर्ण उल्लेख नावात करण्यात आला आहे. यापूर्वी मुंबईतील इंटरनॅशनल एअरपोर्टला छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ म्हटलं



जात होतं. मात्र आता त्यात ‘महाराज’ या शब्दाची भर घालण्यात आली आहे. नागरी हवाई उड्डाण मंत्री सुरेश प्रभू यांनी ट्विटरवरुन यासंदर्भात माहिती दिली. महाराष्ट्रातील जनतेने यासंदर्भात कित्येक वर्षांपासून मागणी केली होती. ती अखेर पूर्ण झाल्याबद्दल प्रभूंनी महाराष्ट्रीय नागरिकांचं अभिनंदनही केलं.

# राज्यातील ३ शहरांत नक्षलवादविरोधी कक्ष

**मुंबई (प्रतिनिधी)-** नक्षलवादाची बीजे शहरी भागांतही रुजत असल्याच्या पार्श्वभूमीवर दहशतवाद विरोधी पथकाच्या एटीएस धर्तीवर राज्यात नक्षलवादविरोधी कक्ष सुरू करण्याचा गृह विभागाचा विचार आहे. मुंबई, पुणे आणि औरंगाबाद येथे हे कक्ष स्थापन करण्यात येण्याची शक्यता असल्याचे सूत्रांनी सांगितले.



दुर्गम भागांतील नक्षलवाद शहरी भागातही पसरत असल्याचे उघड होत आहे. महाराष्ट्र ‘एटीएस’च्या पथकाने काही महिन्यांपूर्वी मुंबई परिसरातून काही संशयित नक्षलवाद्यांना अटक केली होती. ते सांकेतिक शब्दांचा वापर करत असल्याचे तपासात उघड झाले होते. या पार्श्वभूमीवर शहरी भागांत फोफावू पाहणाऱ्या नक्षलवादाचा बीमोड करण्यासाठी राज्यातील प्रमुख शहरांत हे कक्ष सुरू करण्याचा गृह विभागाचा विचार आहे. गडचिरोलीसारख्या भागांत नक्षलवाद्यांशी दोन हात करताना पोलिसांना सावधगिरी बाळगावी लागते. तेथे ‘आयईडी’ स्फोटके आणि भूसुरुंगांचा धोका असतो. या पार्श्वभूमीवर गृह विभागाने लष्कराच्या जबलपूर येथील कारखान्यात तयार केलेली विशेष वाहने खरेदी केली आहेत. घनदाट जंगलात नजर ठेवण्यासाठी उच्च क्षमतेच्या ड्रोनचा वापर होत असल्याची माहितीही सूत्रांनी दिली.

# नोटाबंदीनंतर १५ लाख कोटींच्या जुन्या नोटा परत

**नवी दिल्ली (पीटीआय)-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अचानक घेतलेल्या नोटाबंदीच्या निर्णयानंतर चलनातून बाद झालेल्या तब्बल ९९.३० टक्के म्हणजे १५ लाख कोटींच्या जुन्या नोटा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे जमा झाल्या आहेत. केवळ १३ हजार कोटी रुपयांच्या नोटा बँकेत आल्या नाहीत. बँकेचा २०१७-१८ चा वार्षिक अहवाल आज सादर झाला असून त्यातील आकडेवारीवरून नोटाबंदीचा निर्णय फसल्याची टीका काँग्रेससह विरोधी पक्षांनी केली आहे तर नोटाबंदीच्या निर्णयामागील सर्व हेतू साध्य झाल्याचा दावा भाजपने केला आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा २०१७-१८ चा वार्षिक अहवाल प्रकाशित करण्यात आला. आरबीआयने यासंबंधी ट्विट करून सविस्तर अहवाल पाहण्यासाठी लिंक दिली आहे. या अहवालात गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत यंदा भारताच्या अर्थव्यवस्थेत सुधारणा झाल्याचे म्हटले आहे. देशात गुंतवणूक आणि उत्पादनाचे प्रमाण वाढले असून महागाई काही प्रमाणात कमी झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. अप्रत्यक्ष कर प्रणालीत जीएसटी मैलाचा दगड ठरल्याचे अहवालात म्हटले आहे.

दरम्यान, नोटाबंदीच्या निर्णयामुळे काळ्या पैशाला आळा, दहशतवादाला मिळणाऱ्या निधीत घट, नक्षलवाद कमी होईल, हे सर्व उद्देश साध्य झाल्याचा दावा सरकारकडून करण्यात आला आहे; परंतु हा दावा फोल आहे. नोटाबंदीमुळे लाखो लोकांचा रोजगार गेला. नोटा बदलून घेण्यासाठी बँकांपुढे लागलेल्या रांगांमध्ये शंभरहून अधिक लोकांचा मृत्यू झाला.




# एसटीच्या पत्र्याने घेतला महीलेचा जिव

**रत्नागिरी (योगेश होळंब)-** शनिवारी रत्नागिरीतील कुवारबाव येथे बसच्या चाकाखाली सापडून एका महिलेचा बळी गेला. अश्विनी कामत या पुढच्या दरवाजाने कुवारबाव साईनगर स्टॉपवर उतरत असताना त्यांच्या साडीचा पदर दरवाजाच्या पत्र्यात अडकल्याने हा अपघात झाला असे नातेवाईकांचे म्हणणे आहे. दरवाजाच्या पत्र्यात पदर अडकल्यावर हि महिला आपला अडकलेला पदर सोडविण्याचा प्रयत्न करीत असतानाच चालकाने गाडी सोडल्याने मागील चाकाखाली सापडून सदर महिलेचा दुर्दैवी अंत झाला असे बसमधील प्रवाशांचे म्हणणे आहे. या मृत्यूला एसटीच्या दुरावस्थेतील गाड्या आणि बेफिकीरपणे





एसटी पुढे नेणारा चालक जबाबदार असल्याचा आरोप मृत महिलेच्या नातेवाईकांनी केला आहे. रविवारी मृतदेहाचे शवविच्छेदन झाल्यावर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला होता मात्र अखेर एसटी प्रशासनाच्या मध्यस्ती नंतर मृतदेह ताब्यात घेतला. अनेकवेळा प्रवासी उतरत असतानाच बस पुढे नेली जाते नेमका हाच प्रकार या महिलेच्या बाबतीत घडला. प्रवासी पूर्ण उतरला आहे कि नाही हे पहाणे चालक वाहकाचे काम आहे पण अनेकवेळा याकडे गांभीर्याने पहिले जात नाही. या दुर्दैवी अपघातामुळे या महिलेचे कुटुंब एकाकी पडले आहे. अंगणवाडी सेविका म्हणून कार्यरत असणाऱ्या या महिलेवर संपूर्ण कुटुंबाच्या पालनपोषणाची जबाबदारी होती. चालक वाहकाच्या बेफिकिरीमुळे या महिलेचे कुटुंब वाऱ्यावर पडले आहे. या मृत्यूला केवळ एसटी प्रशासन जबाबदार असून या महिलेच्या मुलाला एसटी प्रशासनाने नोकरी द्यावी अशी मागणी देखील या महिलेच्या नातेवाईकांनी केली आहे.

MEDIA 9 Advertising
For Advertise on
TV9 IBN लोकमत NEWS18 लोकमत साम TV
Birthday / Anversery Wishes ,
Commercial Advt / Corporate Advt
Contact Today - 8655556626
We Also Develop Website and Mobile Apps